KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)

# “भारतीय सार्वजनिक ग्रंथालयासमोरील आव्हाने”

**डॉ. शिवशंकर घुमरे,**
ग्रंथपाल,
मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणिज्य महविद्यालय, अंबड, जि. जालना

**श्रीमती कुंता पंढरीनाथ गव्हाड,**
विद्यार्थी, पदव्युत्तर पदवी ग्रंथालय शास्त्र विभाग,
विवेकानंद महविद्यालय,
यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**सार:**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ग्रंथालयाचे स्वरूप स्पष्ट करण्यात येऊन सार्वजनिक ग्रंथालयासमोर कोणकोणती आव्हाने आहेत याची सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. सार्वजनिक ग्रंथालय समोरील आव्हानांचा सखोल अभ्यास या शोधनिबंधामध्ये करण्यात येणार आहे.

मुख्य शब्द: सार्वजनिक ग्रंथालय, भारतीय ग्रंथालय, ग्रंथालयासमोरील आव्हाने.

**प्रस्तावना:**

व्यक्ती मनाच्या बौद्धिक जडणघडणीसाठी ग्रंथ आवश्यक असतात. ग्रंथालय या ग्रंथसंपदेला आपल्यामध्ये सामाविष्ट करुन सामाजिक जागृतीचे कार्य अविरतपणे करत असतात. ग्रंथालयाची सेवा देणे ही एक आव्हानात्मक बाब असून सार्वजनिक ग्रंथालयाच्या बाबतीत ही आव्हाने खूप मोठ्या प्रमाणावर असल्याचे निदर्शनास येत आहे. वाचकाच्या विविध गरजा लक्षात घेता ग्रंथालयाचे विविध प्रकार आहेत. त्याची आव्हाने व मर्यादा हयाही वाढतच आहेत. एकीकडे संशोधन ग्रंथालय एक उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. त्याच वेळी सार्वजनिक ग्रंथालयाच्या सेवा आणि विकास यामध्ये अनेक अडचणी येत आहेत. सार्वजनिक ग्रंथालय प्रशासन आणि त्याचा होणारा उपयोग पाहता बरेच प्रश्न उपस्थित होतात. समाजातील अशिक्षित, उपेक्षित, दुर्लक्षित लोकांना ही ग्रंथालय सेवा मिळविण्याचा हक्क आहे. लोकांना विनामूल्य सेवा पुरविणे आधुनिकीकरणाच्या कालखंडाला ग्रंथालय सेवांना अद्यावत करणे, विविध वयोगटाच्या वाचकांच्या वेगवेगळ्या गरजा भागविणे ही जबाबदारी सार्वजनिक ग्रंथालयवरती असते. या जबाबदारीचे निर्वहन करताना सार्वजनिक ग्रंथालयासमोर अनेक अडचणी व आव्हाने निर्माण होतात.

**विषय विवेचन:**

सार्वजनिक ग्रंथालय ही संकल्पना सर्वप्रथम प्रथमता रोम येथे उदयास आलेली आपणास दिसते. युनेस्को सार्वजनिक ग्रंथालयाच्या जाहीरनाम्यामध्ये विनामूल्य सेवा, सहज पोचविता येईल अशा मोक्याच्या ठिकाणी ग्रंथालय असणे व कायद्याचा आधार अशा काही महत्त्वपूर्ण मुद्द्यांची चर्चा आली आहे. त्याच अनुषंगाने पुढे सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासासाठी अनुकूल वातावरण तयार होऊन सार्वजनिक ग्रंथालयाची निर्मिती होऊ लागली.

देशांमध्ये कोणतीही व्यक्ती, समाज वा राष्ट्राच्या जडणघडणीत ग्रंथ व ग्रंथालयाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. माहिती, ज्ञान, मनोरंजन आणि जिज्ञासापूर्तीचे साधन या दृष्टीने ग्रंथांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच बौद्धीक विकासाचे शक्तीकेंद्र आणि सामाजिक विकासाचे ऊर्जा केंद्र म्हणून सार्वजनिक ग्रंथालयांची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसारासाठी, ज्ञान, माहिती आणि मनोरंजन यांचे प्रमुख केंद्र म्हणून सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली'' विकसित करणे अपरिहार्य आहे.[१]

सार्वजनिक ग्रंथालये ही सर्वसामान्य वाचकाला विनामूल्य सार्वजनिक ग्रंथालयाची सेवा देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडत असतात. शिवाय खेडे किंवा त्यांच्या परिसरातील लोकांसाठी, शहरी भागातील महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या विविध स्तरातील वाचकांच्या गरजा पूर्ण करण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालय आपल्या सेवेच्या माध्यमातून करत असतात. ग्रामीण पातळीवरील ग्रामपंचायत कार्य क्षेत्रांमध्ये कार्य करणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सामान्य वाचकांपर्यंत वाचन साहित्य पोहोचवून त्यांच्यामध्ये एक प्रकारची सामाजिक जागृती करण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालय आपल्या या सेवांच्या माध्यमातून करतात. म्हणजेच सार्वजनिक ग्रंथालय ग्रामीण पातळीपासून ते केंद्रीय पातळी पर्यंतची कहाणी आपल्या विविध

सेवांच्या माध्यमातून एक प्रकारची जागृती घडवून आणत असतात. खेडे किंवा त्याच्या परिसरातील लोकांसाठी एखादे सार्वजनिक ग्रंथालय असणे आवश्यक आहे असे ग्रंथालय त्या गावचे माहिती केंद्र म्हणून काम करू शकेल.[२]

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ अन्वये राज्यात सार्वजनिक ग्रंथालये व सार्वजनिक ग्रंथालये पद्धतीचे नियोजन, प्रस्थापना, परिरक्षण, संघटन व विकास साधण्यासाठी ग्रंथालय संचालनालयाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, नवीन सार्वजनिक ग्रंथालये प्रस्थापित करून त्यांचा विकास साधने, सार्वजनिक ग्रंथालयामध्ये जुने व दुर्मिळ ग्रंथ, नियतकालिके, हस्तलिखिते यांचा संग्रह करून तो जतन करणे, ग्रंथालय विभागाचा वार्षिक अहवाल दरवर्षी राज्य ग्रंथालय परिषदेच्या मान्यतेनंतर शासनास सादर करणे, सार्वजनिक ग्रंथालये, ग्रंथालय संघ यांना शासन मान्यता व तदर्थ, परिरक्षण, साधनसामग्री व अन्य सहाय्यक अनुदाने ग्रंथालय निधीतून मंजूर करणे, ग्रंथालय निधीचा हिशोब ठेवून तिचा योग्य विनियोग करणे, ग्रंथालय शास्त्राच्या प्रशिक्षण वर्गांच्या परीक्षा घेणे व प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे तसेच राज्यात प्रसिद्ध झालेल्या सर्व पुस्तकांची एक ग्रंथसूची प्रतीवर्षी प्रसिद्ध करण्याची जबाबदारीही ग्रंथालय संचालनालयाची आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम १९६७ मधील प्रकरण-२ अनुच्छेद तीन अन्वये राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना करण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ च्या अंमलबजावनेशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर राज्य शासनास सल्ला देणे हे सदर परिषदेचे मुख्य काम आहे. प्रस्तुत अधिनियमात प्रत्येक महसुली जिल्ह्यासाठी जिल्हा ग्रंथालय समितीची प्रस्थापना करण्याची तरतूद आहे. जिल्ह्यातील ग्रंथालय सेवेचा योग्य धर्तीवर विकास साधण्यासाठी सर्व बाबींवर राज्य शासनास सल्ला देणे, सार्वजनिक ग्रंथालय संबंधात विहित करण्यात येतील अशी कामे त्याजकडून समाधानकारकपणे पार पाडण्यात येत आहेत याबद्दल खात्री करून घेणे इत्यादी जिल्हा ग्रंथालय समितीची कामे आहेत.[३]

ग्रामीण पातळीवरील सार्वजनिक ग्रंथालयांनी गावांमध्ये, जिल्हा ग्रंथालयांनी जिल्हा पातळीवरील आणि तालुका पातळीवरील ग्रंथालयांनी तालुक्याच्या ठिकाणी काम करून एक प्रकारे या सर्व ग्रंथालयांमध्ये समन्वय घडवून आणला पाहिजे अशी ग्रंथालय पद्धती विकसित करण्यात आली आहे. आदिवासी भागात तसेच अल्पसंख्याकांसाठी विशेष सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करून सेवा देण्याचा प्रयत्न सरकार करत असते. वेगवेगळ्या वयाच्या वाचकांच्या वेगवेगळ्या गरजा भागविण्यासाठी वेगवेगळे वाचन साहित्य पुरविण्याचा आग्रह सार्वजनिक ग्रंथालयाचा असतो. भारताची फार मोठी लोकसंख्या ग्रामीण भागामध्ये राहते. या ग्रामीण भागातील शेतकरी, वंचित व ज्ञानापासून कोसो मैल दूर असणाऱ्या लोकांमध्ये सामाजिक जागृती निर्माण करण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालयांनी करावे ही या ग्रंथालयाच्या स्थापनेपाठीमागची भूमिका असते. त्याचबरोबर सार्वजनिक ग्रंथालयांनी उद्बोधन केंद्राच्या भूमिकेतून काम करावे, प्रशिक्षणासाठीचे प्रयत्न करावे अशी अपेक्षा या ग्रंथालयाकडून आपण करत असतो. सार्वजनिक ग्रंथालय ही एक संस्था म्हणून काम करत असताना तिला काही आव्हानांना सामोरे जावे लागते त्या आव्हानांची चर्चा प्रस्तुत ठिकाणी आपण करणार आहोत.

**१. समाजातील विविध घटकांना सेवा देताना येणाऱ्या अडचणी:**

सार्वजनिक ग्रंथालय शहरी, खेड्यापाड्यात राहणारे, दुर्गम भागात राहणाऱ्या नागरिकच नव्हे तर प्रसंगवष नेहमीच्या जीवनापासून ज्यांना दूर जावे लागले अशा सैनिकी जीवनातील जवानांना, दवाखान्यातील रुग्णांना, एवढेच नव्हे तर तुरुंगातील कैद्यांना, त्याचप्रमाणे अपंग मतिमंद अशा लोकांना ही सेवा देण्याचे ध्येय येऊन निर्माण झालेली आहे. आहे अशा सर्व घटकांना सेवा देणे हे सरकार आपले कर्तव्य मानत असते. मात्र या कर्तव्याचे निर्वाहन करत असताना सार्वजनिक ग्रंथालयांना काही अडचणींचा सामना करावा लागतो. सार्वजनिक ग्रंथालय सेवा म्हणजे नागरिकांचे वैचारिक प्रबोधन करण्याचे साधन.[४] त्यामध्ये आदिवासी वंचित दुर्लक्षित आणि समाजाशी संपर्क नसलेल्या अशा ठिकाणी जास्तीत जास्त लोक हे अशिक्षित व आणि असतात आणि त्यांना सेवा देणे व त्यांच्यापर्यंत पोचविणे हे खऱ्या अर्थाने सार्वजनिक ग्रंथालय समोरील खडतर आव्हान आहे. शिवाय वाचकांच्या आवडीनिवडी वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. त्यानुसार समाजातील विविध घटकांना त्यांच्या आवडीनिवडीप्रमाणे सेवा देऊन त्यांची वाचनाप्रतीची मानसिकता टिकून ठेवणे हे आजच्या आधुनिक युगामध्ये जिकरीचे कार्य सार्वजनिक ग्रंथालयांना करावे लागते. ही बाब दिसण्यास अतिशय सौम्य प्रकारची जरी असली तरीसुद्धा वाचक असणे वाचन साहित्यासाठी आवश्यक असते. याशिवाय वाचन साहित्याचे महत्त्व असणार नाही आणि म्हणून समाजातील विविध घटकांना

सेवा देत असताना येणाऱ्या विविध अडचणी पैकी दुर्लक्षित घटकांना, अतिशय दुर्गम भागातील लोकांना आणि समाजाशी फारसा संपर्क नसलेल्या विविध घटकांना सेवा देणे ही एक आव्हान सार्वजनिक ग्रंथालय समोर आहे.

**२. ग्रंथालयांना मिळणारा अपुरा निधी:**

सार्वजनिक ग्रंथालय हे लोकांनी, लोकांसाठी चालविण्यात आलेली ग्रंथालय आहे. "सार्वजनिक ग्रंथालय" हे त्यामुळे लोकांनी पुढाकार घेऊन एकत्र येऊन त्यांच्या गावी सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करावे व ते नोंदणीकृत करावे असे अपेक्षित आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमाने देखील गावात ग्रंथालय सुरु करावे, असे अपेक्षित आहे. परंतु सार्वजनिक ग्रंथालय याकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टिकोन लक्षात घेता आणि ग्रंथालयांना मिळणारे अपुरे अनुदान व निधी आणि हे निधी प्राप्त करण्यासाठी अवलंबिण्यात येणारी किचकट प्रक्रिया या सर्वांमुळे प्रस्तुत त्यांना मिळणारा निधी अपुरा पडल्यामुळे सार्वजनिक ग्रंथालय उत्कृष्ट सेवा देण्यामध्ये असमर्थित आहेत आणि त्यामुळे एक प्रकारे सार्वजनिक ग्रंथालयात समोर एक आव्हान निर्माण होत आहे.

राज्यातील ग्रंथालयांची स्थिती अत्यंत वाईट आहे. अनुदान दोन हफ्त्यांमध्ये मिळते. मात्र त्यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. अनुदानातील पन्नास टक्के रक्कम पुस्तकावर व उर्वरित रक्कम पगारावर खर्च होते. पैशांच्या अभावी दर्जाहीन खरेदीवर भर दिला जातो. लोकांना ग्रंथालयांमध्ये जावे, असे वातावरण तयार करावे लागेल. त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला पाहिजे.[५]

**३. जागा उपलब्ध नसणे:**

कोणत्याही ग्रंथालयाचा विकास होण्यासाठी ग्रंथालयाची भौतिक सुविधा कारणीभूत ठरत असते. भौतिक सुविधांच्या उपलब्धतेवर ग्रंथालयाच्या सेवांचा प्रभाव निर्माण होत असतो. मानवाच्या जगण्यासाठी मूलभूत गरज म्हणून ज्या पद्धतीने निवारा आवश्यक असतो त्याच पद्धतीने ग्रंथाच्या रक्षणासाठी उत्कृष्ट इमारत आणि आणि सुरक्षित जागेची आवश्यकता असते. वाढत्या शहरीकरणाच्या कालखंडामध्ये शहरांमध्ये जागांचा अभाव आपणास जाणवतो व उपलब्ध जागा असतील त्या मोक्याच्या ठिकाणी नसतात. मोक्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर ती भाडे देणे भाग पडते. यामुळे ग्रंथालयासाठी जागा उपलब्ध नसणे हे एक आव्हान निर्माण झाले आहे.

**४. उदार व्यक्तिमत्वाचे अर्थसहाय्य कमी होणे:**

सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासात सरकारची भूमिका महत्त्वपूर्ण असली तरी सरकारचे अनुदान जेव्हा अपूर्ण पडू लागते तेव्हा समाजातील उदार व्यक्तिमत्वे समोर येऊन ग्रंथालयाच्या विकासाची व सेवा सुविधांच्या विकासातील जबाबदारी आपल्या उदार अनुदानाने पूर्ण करत असतात. समाजातील प्रतिष्ठित आणि सुशिक्षित असणाऱ्या किंवा नसणाऱ्या उदार व्यक्तिमत्त्वाच्या अर्थसाह्य यामुळे मोठी ग्रंथालये चालवली जातात या ग्रंथालयाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांच्या ज्ञानदानाचे कार्य सांभाळले जात असते. समाजातील नेतृत्व स्थानी असलेल्या व्यक्तींची, संस्थांची आणि प्रशासनाचा गाडा चालविणाऱ्या नोकरशाहीतील समस्त घटकांशी संपर्क राखणे, यातील प्रत्येकाशी संपर्क साधण्यास वेगवेगळी माध्यमे, वेगवेगळे मार्गच प्रभावी ठरू शकतात.[६] या व्यक्तींच्या मदतीने व संपर्काने अनेक व्यक्ती एखाद्या ग्रंथालयाशी संलग्नित होऊन सार्वजनिक ग्रंथालयास काही अनुदाने देत असतात आणि याच अनुदानाच्या माध्यमातून ही ग्रंथालये उभी राहत असतात. परंतु अलीकडच्या कालखंडामध्ये उदार व्यक्तिमत्त्वांच्या अर्थसहाय्य देण्याच्या भूमिकांमध्ये झालेल्या बदलामुळे या ग्रंथालयाची सरकार व्यतिरिक्त असणारी बाजू कमकुवत झाल्याचे आपणास दिसते आणि त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांना एक प्रकारची हानी झाल्याचे जाणवते.

**५. कर्मचाऱ्यांना मिळणारे तुटपुंजे वेतन:**

कर्मचारी त्याचे कर्तव्य जीवन निर्वाह भागविण्यासाठी करत असतात. त्यांच्या कुटुंबाची गरज या कर्तव्यच्या माध्यमातून भागविली जावी आणि त्यांच्या पायाभूत गरजा पूर्ण होऊन आवश्यक त्या सेवा सुविधांचा त्यांच्या जीवनामध्ये त्यांना लाभ घेता यावा. म्हणजे त्यांचे कुटुंब सुखी असावे अशी प्रत्येक कर्मचाऱ्याची इच्छा असते आणि म्हणून कर्मचाऱ्यांना आवश्यक जगण्यायोग्य पगार मिळणे ही एक काळाची गरज बनली आहे. वाढती महागाई आणि जागतिकीकरणामुळे प्रत्येक गोष्ट महाग होत चालली आहे आणि अशा या धकाधकीच्या युगामध्ये अर्ध पगारी, बिनपगारी, विनापगारी असे अनेक प्रकार कर्मचारी वर्गामध्ये निर्माण होताना आपल्याला दिसतात. त्यामुळे या आर्थिक विवंचना या कर्मचाऱ्यांना सहन कराव्या लागत असतील

तर त्यांची ग्रंथ आणि सार्वजनिक ग्रंथालयात त्यांची काम करण्याची उत्कट इच्छा कमी झालेली असेल.

एकीकडे सरकारी कर्मचाऱ्यांना सातवे वेतन लागू करण्याचा विचार सुरू असताना अतिशय तुटपुंज्या वेतनावर जवळपास निम्म्याहून अधिक वाचनालयातील कर्मचारी काम करत आहे. गाव तिथे ग्रंथालय ही चळवळ अधिक व्यापाक राबविण्याचा प्रयत्न करत ज्ञानाची गंगा खेड्यापाड्यात नेण्यात आली. मात्र ग्रंथालयाच्या अनुदानात कोणतीच वाढ न करता ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना अर्धपोटी राबवून घेतले जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासूनची कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीची मागणी सरकारी लालफितीत आहे.[७]

**६. अपुरा आणि कालबाह्य साठा:**

आधुनिकीकरणाच्या कालखंडामध्ये आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये कोणतीही गोष्ट आद्यवत नसणे हे अत्यंत धोक्याचे आहे. सार्वजनिक ग्रंथालय चालवत असताना वाचकाच्या बदलत्या गरजेप्रमाणे वाचन साहित्य उपलब्ध करणे आणि ते वाचकांपर्यंत पोचविण्यासाठी नवनवीन उपायोजना योजने अत्यंत आवश्यक असते. पूर्वीच्या काळी वाचत स्वतः ग्रंथालयाकडे आकर्षित होऊन वाचनाच्या प्रेरणेने वाचनालयात येऊन वाचन साहित्य शोधत असे. मात्र आज या परिस्थितीमध्ये बदल होताना आपल्याला दिसतो आहे. वाचन साहित्य सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविणे आणि लोकांना आकर्षित करणे ही आज काळाची गरज बनत चालली आहे. हे शिवाय हे वाचन साहित्य वाचकाच्या गरजांशी सुसंगत आहे का हे तपासून पाहणे सुद्धा अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे पारंपारिक ग्रंथालयांमध्ये असणाऱ्या अपुऱ्या आणि कालबाह्य असणाऱ्या साठ्याऐवजी नवीन व आद्यवत संसाधने निर्माण करणे हे एक मोठे आव्हान सार्वजनिक ग्रंथालय समोर निर्माण झाल्याचे दिसते.

ग्राहकांच्या मागणीतील बदल लक्षात घेऊन त्यांच्या निधीची सामग्री आणि प्रकार विस्तृत करणे, संदर्भ प्रकाशने (विश्वकोश, शब्दकोश), सार्वभौमिक आणि थीमॅटिक स्वरूपाची ग्रंथसूची मदत, व्यवसायाचे स्रोत, व्यावसायिक आणि आर्थिक माहितीचा हिस्सा वाढवण्यासाठी. संदर्भ यंत्राची गुणवत्ता सुधारण्यासाठी (कॅटलॉग, कार्ड फाइल्स) संदर्भग्रंथ आणि तथ्यात्मक माहितीचा स्रोत म्हणून. अधिकाधिक वेळा, मुद्रित सामग्रीमध्ये परावर्तित झालेल्या माहितीची सत्यता सत्यापित करण्यासाठी, योग्य आणि किफायतशीर शोध मार्ग निवडण्यासाठी आणि ग्रंथसूची आणि तथ्यात्मक शोधासाठी अल्गोरिदम विकसित करण्यासाठी ग्रंथपालाने सक्षम असणे आवश्यक आहे.[८]

**७. पात्रताधारक कर्मचाऱ्यांचा अभाव:**

संस्था किंवा संघटना आणि शासनाच्या कोणत्याही विभागाची कार्यक्षमताही तिथल्या कर्मचाऱ्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. कर्मचाऱ्याची गुणवत्ता जितक्या प्रमाणात महत्त्वाची असते. तितक्याच प्रमाणात त्यांची नैतिकता आणि कार्याप्रती असणारी सजगता या गोष्टीदेखील तितक्याच महत्त्वाच्या असतात. कोणत्याही पात्रताधारक व्यक्तीच्या ठिकाणी आपले काम उत्कृष्टपणे पार पाडण्याची क्षमता असते आणि आपल्या क्षमतेचा वापर तो व्यक्ती कार्य करत असताना करत असतो. म्हणून कुठली ही सेवा पूर्ण करण्यासाठी पात्रताधारक व्यक्ती असल्यास ते काम उत्कृष्टपणे हाताळल्या जाऊ शकते आणि त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामात आपल्याला सकारात्मकता दिसून येत असते. म्हणून पात्रताधारक कर्मचारी सार्वजनिक ग्रंथालयाच्या कार्यात सहभागी असणे अत्यंत आवश्यक असते. परंतु कधी कधी पात्रताधारक असणारे कर्मचारी हे मोठ्या संघटनांमध्ये कार्य करण्यास इच्छुक असतात. ग्रामीण पातळीवरील सार्वजनिक ग्रंथालयात, तुटपुंज्या वेतनावर आणि एखाद्या दुर्गम ठिकाणी काम करण्यास तयार नसतात आणि त्यामुळे पात्रताधारक कर्मचाऱ्यांचा अभाव हा सार्वजनिक ग्रंथालयाच्या हितासाठी घातक ठरतो.

**८. आय.सी.टी. (ICT) ला प्रोत्साहन देणाऱ्या राष्ट्रीय धोरणांचा अभाव:**

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आय.सी.टी. ला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. हे परंतु सार्वजनिक ग्रंथालय ही ग्रामीण पातळीवर मोठ्या प्रमाणावर काम करत असताना आय.सी.टी. तंत्रज्ञानाचा किंवा संगणक तंत्रज्ञानाचा अभाव आपणास जाणवतो. संगणकाच्या वापराने कार्याची अचूकता सांगता येते. शिवाय ते संकलन सोपे होऊन माहितीची देवाणघेवाण सहज शक्य होते. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांनी संगणकाचा वापर करून आपली माहिती जतन करून ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. माहिती तंत्रज्ञानाच्या वापराने नष्ट होत चाललेली ग्रंथसंपदा आपण स्कॅन स्वरूपात ठेवू शकतो आणि ती भावी वाचकाला उपयोगी होऊ शकते. परंतु आजही बऱ्याच सार्वजनिक ग्रंथालयात संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाचा वावर असून वापर मात्र पूर्ण होत नसल्याचे आपणास सहज लक्षात येऊ शकते आणि त्यामुळे सरकारने माहिती तंत्रज्ञान

किंवा आय.सी.टी. ला प्रोत्साहन देणाऱ्या विविध धोरणांचा पुरस्कार केला आहे त्यापेक्षा उत्कृष्ट पद्धतीने कसा करता येईल याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

**९. सभ्यता आणि नागरी सहभागामध्ये घट:**

आजच्या धकाधकीच्या युगामध्ये प्रत्येक व्यक्तीला हव्या त्या गोष्टी आपल्या जवळच मिळाव्यात असे वाटत आहे. ग्रामीण पातळीवरील लोक आता जागतिक पातळीवरील विचार करत असल्यामुळे ग्रामीण किंवा नागरी सभ्यता किंवा लोकांची अपेक्षा सुखी जीवनाची प्राप्ती कशी करता येईल याकडे झाली आहे. शिवाय माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रचंड विकासामुळे उपलब्ध वाचन साहित्य आज मोबाईल किंवा इतर सामाजिक माध्यमांच्या द्वारे वाचकांपर्यंत पोहोचू शकत असल्यामुळे किंवा ग्रंथालयात येऊन वाचन करण्याची सवय फारशी न राहिल्याने लोकांनी सार्वजनिक ग्रंथालयाकडे कानाडोळा केल्याचे आपणास दिसते आणि खऱ्या अर्थाने हे सार्वजनिक ग्रंथालयसमोरील आव्हान आहे.

**१०. वाचनात घट:**

"वाचाल तर वाचाल" असे म्हणणारे लोक आता वाचनाशिवाय जगताना आपल्याला दिसतात. शब्द शस्त्र असतात आणि हे शास्त्र मानवाच्या विकासासाठी किंवा त्याच्या उत्तम मानसिक विकासासाठी आवश्यक आहेत याची जाणीव पूर्वीच्या काळातील लोकांना प्रचंड प्रमाणात होती. मात्र वाढत्या जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे लोक तंत्रज्ञानाच्या अति आहारी जाऊन ग्रंथ आणि वाचन याकडे दुर्लक्ष करत असल्याचे आपणास दिसते. पूर्वी लोक पुस्तके मोठ्या प्रमाणावरती वाचत आणि पुस्तके वाचण्यासाठी खूप वेळही देत असत. शिवाय पुस्तके वाचल्यानंतर ते इतर लोकांनाही वाचण्यासाठी सांगत आणि वाचलेली कोणतीही महत्त्वाची माहिती इतरांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करत असत किंवा पोहोचत असत. त्यामुळे वाचन साहित्याचा प्रचार आणि प्रसार होत असत. शिवाय या समाजामध्ये वाचन साहित्य वाचण्याची ओढ निर्माण होत असे. मात्र आजच्या कालखंडामध्ये वाचनामध्ये घट झाल्यामुळे सार्वजनिक हे ग्रंथालयासमोर वाचक वर्ग मिळविण्याचे एक आव्हान निर्माण झाले आहे.

समारोप:

अशाप्रकारे सार्वजनिक ग्रंथालय हे मानवाच्या बौद्धिक विकासासाठी अत्यंत आवश्यक असून ग्रामीण पातळीपासून ते मोठ्या शहरापर्यंतच्या लोकमनाची मशागत करण्यासाठी ही ग्रंथालय आवश्यक असल्याचे आपणास दिसते. सार्वजनिक ग्रंथालय ही अल्प किंवा मोफत सेवा उपलब्ध करून देत असल्यामुळे ही ग्रंथालय जनसामान्यांच्या वाचनाचा प्रमुख आधार आहे. मात्र या ग्रंथालयात समोरही अनेक आव्हाने उभी होतांना आपल्याला दिसतात. त्यामध्ये वाचन साहित्याची अद्यावता असणे, सरकारचे उदासीन धोरण, माहिती व तंत्रज्ञानाच्या सेवा सुविधांचा अभाव, कर्मचाऱ्यांना अपुरे वेतन व अपुरा निधी यासारख्या अनेक समस्यांना सामोरे जाण्याचे खडतर आव्हान या ग्रंथालयात समोर निर्माण झाले आहे.

संदर्भ:

1. https://dol.maharashtra.gov.in/objectives
2. कांबळे नागेश, साळवे वसंत, सार्वजनिक ग्रंथालय, यशवंतराव चव्हाण मराठवाडा मुक्त विद्यापीठ नाशिक.
3. https://mr.vikaspedia.in/social-welfare/civilization/93893e93094d93591c92893f915-91794d93090292593e93292f
4. उपरोक्त, कांबळे नागेश, साळवे वसंत.
5. https://maharashtratimes.com/maharashtra/pune-news/libraries-to-state-libraries/articleshow/70846863.cms
6. उपरोक्त, कांबळे नागेश, साळवे वसंत.
7. https://maharashtratimes.com/maharashtra/thane/the-library-staff-waiting-for-the-wage-hikes/articleshow/65955482.cms?minitv=true
8. https://mylandrover.ru/mr/salon/selskaya-biblioteka-kak-faktor-sohraneniya-kultury-sovremennaya.html.